मराठी विभाग

72/2020

**B.Aadhar'** *International Multidisciplinary Research Journal*
Impact Factor - ( (SJIF) - 7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
May 2020

**Impact Factor – 7.675** ISSN – 2278-9308

# B.Aadhar

***Multidisciplinary International Research Journal***

## Peer-Reviewed Indexed

**May - 2020**

**SPECIAL ISSUE – CCXXXIII (233)**

## Sciences, Social Sciences, Commerce, Education, Language & Law

**Prof. Virag.S.Gawande**
**Chief Editor :**
**Director**
**Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.**

**Dr.Dinesh W.Nichit**
**Editor :**
**Principal**
Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, Walgaon.Dist. Amravati.

330

**Aadhar International Publications**
For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

**B.Aadhar'** *International Multidisciplinary Research Journal*
**Impact Factor - ((SJIF) –7.675,**
**Special Issue**
**ISSN : 2278-9308**
**May 2020**



| | | |
|---|---|---|
| 39 | नागपूर जिल्ह्यातील बचत गटात सहभागिता बचत गट सदस्यांच्या जीवनावर झालेल्या प्रभावा संबंधीचे अध्ययन डॉ. भारती सुदर्शन गोस्वामी, | 164 |
| 40 | नागपूर जिल्हयातीलकळमना कृषी उत्पन्न बाजार समितीचा आर्थिक विकासाचे अध्ययन डॉ. अशोक मंदे | 169 |
| 41 | बचपन की स्वतंत्र सोच : महापुरुषों के सामाजिक संदर्भ में डॉ मधुलता व्यास | 173 |
| 42 | किशोरवयीन मुलांच्या आहारावावत विचार प्रा.प्रिया खोरगडे | 176 |
| 43 | कौटुंबीक अर्थव्यवस्थेवर जागतीकीकरणाचा परिणाम प्रा.डॉ.सौ.सिमा बा.अढाऊ | 180 |
| 44 | भारतीय संगीतातील आध्यात्मीक परंपरा डॉ. वृषाली र. देशमुख | 183 |
| 45 | **पर्यावरण संरक्षण और चिपको आन्दोलन** Dr.Anju A.Sharan | 187 |
| 46 | मजदूर की मजबुरी डॉ सचिन होले | 193 |
| 46 | पर्यावरण संतुलनात महिलांचा सहभाग प्रा.डॉ. मंदाकिनी मेश्राम | 195 |
| 47 | कोसला –एक आकलन अन्वयार्थ डॉ.राजेश मिरगे | 198 |
| 48 | **Information on globalization and employment in India** **Dr.Sanjay J. Kothari** | 200 |
| 49 | वाणिज्य शाखेत मराठी भाषाभ्यासाची उपयुक्तता प्रा.नरेश महाजन | 209 |
| 50 | मराठी भाषा आणि व्यावसायिक संधी प्रा.डॉ.ममता व.दयने | 212 |
| 51 | मराठी साहित्य आणि मानवतावाद डॉ.सविता माधवराव पवार | 215 |



330



Scanned by TapScanner

**B.Aadhar'** *International Multidisciplinary Research Journal*
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
May 2020

# मराठी साहित्य आणि मानवतावाद

प्रा.डॉ.सविता माधवराव पवार
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय,मेहकर जि.बुलढाणा

**प्रस्तावना :**

भगवान गौतम बुद्ध,महात्मा ज्योतिबा फुले,डॉ बाबासाहेब आंबेडकर या महामानवांचा मानवतावाद हा विशुद्ध बुद्धिवादावर आधारलेला आहे. न्याय, स्वातंत्र्य,समता बंधुता यांना त्यांनी प्राधान्य दिलेले दिसते.स्थितीशील प्रवृत्तीला आव्हान देऊन परिवर्तनाचा गुणधर्म त्यांनी स्वीकारलेला आहे. महात्मा फुले यांचा मानवतावाद जाती,धर्म,वर्ण,यांचा धिक्कार करणारा तर सार्वजनिक सत्यधर्माचा मानवतावादी पुरस्कार करणारा आहे. डॉ .बाबासाहेब आंबेडकरांचा मानवतावादी दृष्टिकोन पाहिला तर लक्षात येते की,त्यांनीही जात,धर्म,वर्ण,अस्पृश्यता,अज्ञान,उच्चनीच,अंधश्रद्धा,शोषण,अमानवतायांचा धिक्कार तर स्वातंत्र्य,समता,बंधुभाव,सामाजिक न्याय, बुद्धिप्रामाण्य,विज्ञाननिष्ठ मानवतावादाचा पुरस्कार केला आहे. ' जगा आणि जगू द्या' हे मानवतावादी तत्त्वज्ञान आहे.मानवतावाद म्हणजे माणसाला केंद्रीभूत ठेवून स्वातंत्र्य,समता,बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांना अनुलक्षून निर्माण झालेले साहित्य असे म्हणता येईल.प्रस्तुत शोधनिबंधामध्ये मराठी साहित्यामध्ये या मानवतावादाचे प्रतिबिंब कसे पडले आहे,मराठी साहित्यातून मानवतावादाचे दर्शन कसे घडते याचा शोध घेण्याचा प्रयत्नकेला आहे.

**संत साहित्य आणि मानवतावाद :**

संतांनी शिकविलेला मानवतावादी दृष्टिकोन आजही महत्त्वाचा ठरतो.तेराव्या शतकात अठरापगड जातीधर्माचे संत होऊन गेले.त्यांनी जी साहित्यनिर्मित्ती केली,त्यातून मांडलेला विचार एकविसाव्या शतकातही मानवाला दिशा देणारा आहे.सर्व संतांनी अभंगरचना करताना लोकभाषेला महत्त्व दिले आहे.त्यांनी निर्माण केलेले साहित्य अभिजात आणि मानवजातीला संस्कार देणारे आहे.'भेदाभेद भ्रम अमंगळ' मानून मानवामानवातील भेदाभेद अमान्य करीत संतांनीमानवजातीची सेवा केली आहे. आज शेकडो वर्षे झाले तरी सामाजिक,सांस्कृतिक आणि नैतिक जीवनावर संतांच्या विचारांचा प्रभाव .जाणवतो.जगाच्या कल्याणाचा विचार करणाऱ्या संतांनी समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला आहे.समाजात समतावादी विचार रुजविण्याचा प्रयत्न केला आहे.सदाचार,सहिष्णुता,उदारता,बंधुता,मानवतावाद व मानवी मूल्यांची शिकवण देणाऱ्या संतांनी आपल्या विचार व कार्यातून वारकरी संप्रदाय समृद्ध केला आहे.स्त्रियांना त्याकाळी विषमतेची वागणूक दिली जायची परंतु संतांनी मात्र स्त्रियांवरील हि बंधने दूर करीत,स्त्रियांचे महात्म्य वर्णन केले आहे.संत ज्ञानेश्वर आपल्या अमृतानुभवात म्हणतात, "स्त्री-पुरुष नामभेदे । शिवपण एकले नांदे ॥ "१' संत मुक्ताबाई,जनाबाई,सोयरा,निर्मला,बहिणाबाई अशा अठरापगड जातीतील संत कवयित्रींनी आपल्या अभंगांव्दारे स्वतःला व्यक्त केले आहे व समाजाला शिकवण दिली आहे.संतज्ञानेश्वर,नामदेव,चोखामेळा,बंकामहार,सावता माळी,नरहरी सोनार,गोरा कुंभार,सेना न्हावी यांनी जातीपलीकडे जाऊन मानवी मूल्यांचे महत्त्व पटवून सांगितले आहे.सारी माणसे ही एकाच ईश्वराची



Scanned by TapScanner

लेकरे आहेत. हा विचार समाजाला पटवून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. ज्ञानेश्वरांनी आपल्या पसायदानाद्वारेविश्वबंधुत्वाचीकल्पनामांडलीआहे.

संतांनी आपल्या साहित्य आणि विचारातून सामाजिक ,सांस्कृतिक ,नैतिक,धार्मिक,राजकीयअशा मूल्यांची पाठराखण केलेलीआहे. 'दया, क्षमा,शांती ,तेथे देवांची वसती'असा संदेश देणाऱ्या संतांनी अज्ञानाच्या अंध:कारात सापडलेल्यासर्वसामान्य जनतेला ज्ञानाची व्दारे खुली करून दिली. संतांनी समाजामध्ये असलेली जातीयता,अस्पृश्यता यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने साहित्यनिर्मिती केली. अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी लेखणी हाती घेतली.साऱ्या समाजाला नीतीमूल्यांची आणि मानवतावादाची शिकवण देणारे संततुकाराम महाराज ' जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले .....' असे म्हणत रंजल्यागांजल्याच्या,दु:खीकष्टी जनांच्या कल्याणासाठी झटण्याचा संदेश देतात.ईश्वरप्राप्तीसाठी रानावनात जाण्याची गरज नाही ; रंजल्यागांजल्यामध्ये देव पहा आणि हाच खरा मानवतावाद असल्याचे संत तुकाराम प्रबोधन करतात.संत रामदासही ' शरीर परोपकारी लावावे ' असे सांगत ' दुसऱ्यांच्या दु:खे दु:खवावें । परसंतोषे सुखी व्हावे । अशी शिकवण देतात.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ' या झोपडीत माझ्या ' या कवितेमध्ये मानवतावादी दृष्टिकोन स्पष्टपणे व्यक्त झालेला आहे. त्यांच्या झोपडीत कोणताच भेदभाव नाही. आर्थिक समता आणि बंधुभाव असलेली झोपडी लोकशाही समाजवादाचे आणि सर्वधर्मसमभावाचे प्रतिक आहे. तेराव्या शतकामध्ये महाराष्ट्रामध्ये महानुभाव व वारकरी संप्रदाय उदयाला आले होते.महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्रीचक्रधर आणि संघटक नागदेवाचार्य यांनी आपल्या पंथाच्या व्दारे मानवतेची शिकवण आपल्या अनुयायांना आणि समाजाला दिली. ' जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ' या उक्तीप्रमाणे अखिल संतांनी मानवाच्या कल्याणासाठी आपले आयुष्य वेचले आहे.

**आधुनिक मराठी साहित्य :**

नियम हे मानवासाठी असतात,मानव नियमांसाठी नसतो.हे नियम जर प्रगतीला अडथळा आणण्यास कारणीभूत ठरत असतील तर ते झुगारून द्यायला हवे.जुन्या रूढी परंपरा मोडीत काढायला हव्यातअसा मानवतेचा आणि प्रगतीचा विचार आधुनिक मराठी कवितेचे जनक केशवसुत आपल्या कवितेतून मांडतात ' अंत्यजाच्या मुलाचा प्रश्न ' त्यांना व्यथित करतो.सर्व भेदाभेदाच्या पलीकडे जाणारा त्यांचा ' नवा शिपाई ' शांतीचे साम्राज्य स्थापू इच्छित आहे. ' मळयास माझ्या कुंपण पडणे अगदी न मला साहे ' अशा भावना ठेवणारा हा नवा शिपाई नव्या दमाचा आहे.कोणाचीही भीडभाड न ठेवता जातिधर्माच्या पलीकडे जाऊन मानवतेचा विचार काळाचा लेण्यांवर कोरण्यासाठी सज्ज आहे.

कवी कुसुमाग्रज यांना मानवतावादी कवी म्हटले जाते. त्यांच्या 'हिमलाट ," आगगाडी आणि जमीन ,' 'अहि नकुल ' यांसारख्या कवितांमधून त्यांचा मानवतावाद व्यक्त होतो.जे बलाढ्य आहेत ते निष्ठूरपणे गरिबांवर अन्याय – अत्याचार करतात.हा अन्याय मोडून काढण्यासाठी गरिबांनी एकत्र येऊन प्रतिकार करायला पाहिजे,असे कुसुमाग्रज सांगतात. ' कोलंबसाचे गर्वगीत ' या कवितेत ' मानवतेचे निशाण मिरवू महासागरात जिंकूनि खंड खंड सारा,'असा आत्मविश्वास ते व्यक्त करतात.सामाजिक विषमतेचे भेदक चित्रण त्यांची कविता करते.समाजातील प्रतिष्ठीत व वरचढ लोक गरिबांवर अन्याय करतात. परंतु या संघर्षात शेवटी विजय मात्र गरिबांचा होतो असे कुसुमाग्रजांनी दाखविले आहे .' अहि-नकुल 'या कवितेमध्ये



Scanned by TapScanner

"...संग्राम सरे , रक्ताचे ओघळ जाती ,
आनंदे न्हाती त्यात तृणाची पाती,
पिंजून कापसापरी पडे तो नाग
ते खंड गिळाया जमले कीटक भोती " २

सामाजिक विषमतेने कुसुमाग्रजांचे मन विषण्ण होते.परंतु एक आशावादही ते व्यक्त करतात.सर्वांनी एकत्र येऊन शोषणाचा प्रतिकार केला पाहिजे आणि अन्यायावर मात केली पाहिजे ,असा विश्वास त्यांची कविता दाखविते.

' जा जरा पूर्वेकडे ' या कवितेमध्ये गिधाडांना उद्देशून ते म्हणतात,

" आणि येताना पवाडे संस्कृतीचे गा जरा ,
डोलू द्या सारी धरा ,
मेघमालेतून आम्हा शांततेचे द्या धडे
जा जरा पूर्वेकडे !"३

अन्याय,अत्याचार,शोषण यांनी व्यथित झालेली त्यांची कविता शांततेचा,मानवतेचा संदेश देते. ' वळी ' या कवितेतूनही माणूसकी आपण कशी विसरत चाललो आहे ,याचे दर्शन ते घडवितात.समाजात अन्याय,अत्याचार,शोषण असले तरी मानवतेवर मात्र कुसुमाग्रजांचा विश्वास आहे.

' पेटवू नका देश ' या कवितेमध्ये कवी मिर्झा रफी अहमद बेग यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी देश पणाला लावू नये,मानवतेवर हल्ला करू नये,तर आपण सारे एक आहोत असा जातिधर्मभेदाच्या पलीकडे जाणारा विचार मांडलेला दिसतो.कवी विठ्ठल वाघ आपल्या ' माणूस ' या कवितेमध्ये काकडीच्या वेलीवर कारल्याचे फुल यावे त्याचप्रमाणे माणसाचे अधःपतन झाले आहे.ह्या माणसाचे अधःपतन पाहून आभाळही आपल्या ढगाच्या डोळ्याने रडू लागले आहे.माणसाच्या मनात माणूसकीला पाझर उरला नाही,हे पाहून विषण्ण होतात.बहिणाबाई चौधरी सुद्धा ' माणसा माणसा कधी होशील माणूस ?' असा प्रश्न उपस्थित करतात.माणसाचे खोटेनाटे व्यवहार पाहून बोरीबाभळीच्या अंगावर काटे आल्याची कल्पना त्यांना सुचते.अण्णासाहेब खापर्डे यांच्या ' लोकसंख्या ' या कवितेतून मानवतेची आस प्रगट होताना दिसते. कवी म्हणतात,

" असे हे कसे होते ! .... माणूस माणूस नाही !
माणसामध्ये मांणुसकी .... स्वाभाविकच नाही !
पण तीं असत नाही ! .... काय झाले कळत नाही !
कोठे मांशी शिंकली .... जागाच सापडत नाही ॥"४

लोकनाथ यशवंत हे आंबेडकरवादी विचारांची प्रेरणा असलेले कवी. स्वार्थासाठी जनसामान्यांचा कसा वापर केला जातो यामुळे कवी विषण्ण होताना दिसतात.

पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तोललेली नसून ती श्रमिकांच्या तळहातावर उभी आहे.अशी विज्ञाननिष्ठ भूमिका घेणारे अण्णाभाऊ साठे यांना समाजातील विषमव्यवस्था अस्वस्थ करते. दलित,शोषित,पीडीत यांचे शोषण संपविण्यासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला.शोषणमुक्तीचा ध्यासच त्यांनी घेतला होता.समतावादी विचारांचा पुरस्कार त्यांनी आपल्या साहित्यातून केला.

' उपेक्षितांचे अंतरंग ' व्यक्त करणारे श्री.म.माटे यांनी समाजस्थितीचे वास्तव चित्रण केले.समाजामध्ये दिसणारे भयानक दारिद्र्य,सर्वसामान्यांसाठी महत्त्वाचा ठरणारा भुकेचा प्रश्न ते तीव्रतेने मांडतात. ' उपेक्षितांचे अंतरंग ' आणि ' माणुसकीचा गहिवर ' या कथासंग्रहातून रावणारी, अन्यायपिडीत

**B.Aadhar'** *International Multidisciplinary Research Journal*
Impact Factor - ( (SJIF) -7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
May 2020

आणि संघर्ष करणारी माणसे भेटतात.उपेक्षितांच्या जीवनाचे चित्रण करताना त्यांचा माणुसकीचा गहिवर,मानवतावाद व्यक्त होत राहतो. " माटे हे समाजाचे अभ्यासक आणि समाजसुधारणाचा आस्थेवाईकपणे विचार करणारे लेखक .माट्यांचे लक्ष नुसते ग्रामीण भागाकडे नाही तर ग्रामीण भागातील उपेक्षितांकडे त्यांचे अधिक लक्ष आहे. "५

अण्णाभाऊंची ' फकीरा ' ही सर्वात जास्त लोकप्रिय ठरलेली कादंबरी.फकीरा,रानोजी,शंकरराव पाटील,विष्णुपंत कुलकर्णी,खोत अशा व्यक्तिरेखा या कादंबरीत पाहायला मिळतात.मानवतावाद माणुसकीचे दर्शन या कादंबरीत घडते.लेखक मधुकर वाकोडे यांच्या 'अन्वरशा फकीर ' या व्यक्तीचित्रणातून परस्पर बंधुभाव,माणुसकी सहिष्णूता अनुभवायला मिळते.अन्वरशाला गुलालाची बाधा होत नाही. गावातील लोक त्याला मशीद बांधून देतात. दत्तू पट्टेवाल्याशी त्याची जीवभावाची मैत्री आहे.मराठी साहित्यातून दिसणारा,व्यक्त झालेला मानवतावाद हा समाजपरिवर्तनाची अपेक्षा बाळगणारा आहे.

**समारोप :**

मराठी साहित्यातून दिसणारा मानवतावाद हा जात, धर्म,पंथ,अज्ञान,अंधश्रद्धा,शोषण,श्रेष्ठकनिष्ठता,अमानवता यांचा धिक्कार करून स्वातंत्र्य,समता,बंधुता आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करू पाहणारा आहे.'जगा आणि जगू द्या 'हे तत्त्वज्ञान रुजविणारा आहे.' 'हे विश्वची माझे घर' अशी विश्वबंधुत्वाची शिकवण देणारा आहे.अन्याय,अत्याचार,शोषणाचे दर्शन घडविताना समाजाचे आत्मभाव जागृत करण्याचा प्रयत्नमराठीसाहित्यातून होताना दिसतो. वारकरी संप्रदाय,ज्ञानेश्वरादी संतप्रभावळ, महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्री चक्रधर यांची शिकवण मानवतावादाचीच राहिली आहे.रूढीपरंपरांनी ग्रासलेल्या समाजमनाचे अज्ञान दूर करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. म.फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवांचा मानवतावाद विशुद्ध बुद्धिवादावर आधारलेला आहे.कवी केशवसुत,कुसुमाग्रज,बहिणाबाई,श्री.म.माटे,अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे मानवाविषयीच्या तळमळीतून निर्माण झालेले आहे.

**संदर्भ टिपा :**

१) नासिराबादकर ल. रा., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पाचवी आ.१९९४, पृ.क्र.५८
2) कुसुमाग्रज,विशाखा,कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे,प्रथमावृत्ती-१९४२,पृ.क्र.२९
3) तत्रैव,पृ.क्र.४९
४) वैखरी भाग-३,संपादकीय,अथर्व पब्लिकेशन्स,जळगाव,प्रथमावृत्ती-२०१२,पृ.क्र.१०५
५) देशमाने अशोक, 'मराठी कथा: रूप आणि स्वरूप,'चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद,प्रथमावृत्ती-२०१८,पृ.क्र.९५

330
Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana



Scanned by TapScanner